# नाशिक महानगरपालिका नाशिक

महिला व बालकल्याण विभाग

राजीवगांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक

## स्वारस्याची अभिव्यक्ती सुचना क्र.१ (२०१८-१९) (२रा कॉल)

-----------------------------------------------------------------------------------------

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावर राहणा-या बालकांचे सर्वेक्षण करावयाचे आहे. जेणेकरुन बालकांच्या पुर्नवसनासाठी विशेष कृती दलाच्या माध्यमातुन उपाय योजना करण्यात येणार आहेत.

नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सर्व्हेक्षण करणेकरीता स्वयंसेवी संस्थाकडून ऑफलाईन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल |
|---|---|
| 1. | नाशिक महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यावर राहणा-या बालकांचे सर्वेक्षण करणे. |

**अटी व शर्ती** :-

१) संस्था ही नाशिक विश्वस्थ अधिनियम 1950 व सार्वजनिक संस्था नोंदणी अधिनियम 1860 अतंर्गत किंवा यथास्थित प्रचलित कायद्याने नोंदणीकृत संस्था असावी.

२) सदर संस्था नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील असल्यास प्राधान्य देण्यात येईल.संस्थेने केलेल्या कामाचा अहवाल (अनुभव) अर्जा सोबत सादर करणे आवश्यक राहील.

३) संस्थेतील कार्यरत कर्मचा-यांची सविस्तर यादी अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

४) सर्व्हेक्षणाकरीता येणा-या खर्चाचा तपशिल संस्थेने मुद्येनिहाय सादर करणे आवश्यक आहे. संस्थेने सादर केलेल्या सर्वेक्षण अहवालानुसार त्यांना देयक अदा करण्यात येईल. प्रथम सर्वेक्षण अहवाल सादर केल्यानंतर एकुण खर्चाच्या 30 % रक्कम द्वीतीय सर्वेक्षण अहवाल सादर केल्यानंतर 30 % व पुर्ण सर्वेक्षण केलेल्या कामाचा अहवाल सादर केल्यानंतर उर्वरीत 40 % देयक संस्थेस अदा करण्यात येईल.

५) अर्जासोबत जोडण्यात आलेले कागदपत्रे स्वाक्षांकित (self Attested) केलेली असावी.

६) अर्जदार संस्थेस सलग ०३ वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल (Audit Report) सादर करणे आवश्यक राहील.

७) संस्थेस सर्वेक्षणाचे काम दिलेल्या मुदतीत करणे बंधनकारक राहील.

८) स्वारस्याची अभिव्यक्ती सुचनेस अनुसरुन दाखल झालेले प्रस्ताव अंशतः अथवा पुर्णपणे स्वीकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मा.आयुक्तांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांना असतील.

९) सर्वेक्षण करतांना मुलांचे नाव, लिंग, शिक्षण, अनाथ, एक पालक, व्दिपालक, शिक्षण व्यवसाय, आरोग्य, आजार, निवास इत्यादी बाबी तसेच या व्यतिरिक्त इतर आवश्यक बाबींचा समावेश करुन सर्व्हेक्षण करणे.

वरील अटी व शर्ती पुर्ण करणा-या इच्छुक संस्थानी दिनांक १५/०९/२०१८ पर्यंत दुपारी ३.०० वाजेपावेतो उपआयुक्त (समाजकल्याण) यांचे कार्यालय, तळमजला, राजीवगांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक महानगरपालिका, नाशिक येथे आपले प्रस्ताव सादर करावे. उशीरा सादर केलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.

Sd/-

उपआयुक्त (समाजकल्याण)

नाशिक महानगरपालिका नाशिक

ठिकाण - नाशिक

दिनांक - २९/०८/२०१८